**प्रेस नोट                    दिनांक २९/०८/२०१९**

## सहकारनगर पोलीस स्टेशन पुणे शहर.

## रिक्षामध्ये विसरलेले तीन लॅपटॉप व दोंन मोबाईल केले परत

दिनांक २८/०८/२०१९ रोजी डॉक्टर प्रसाद कोथिंबरे रा. पंचवटी पार्क, चव्हाणनगर, पुणे हे कोठारी ब्लॉक येथुन कुटुंबासह रिक्षामधुन प्रवास करीत असताना पंचवटी पार्क चव्हाणनगर येथे त्यांचे सामान घेवुन उतरले. नंतर त्यांच्या लक्षात आले की, रिक्षामध्ये तीन लॅपटॉप व दोंन मोबाईल विसरले आहेत. ते तात्काळ सहकारनगर पोलीस स्टेशनला आले असता सदर तक्रारदाराकडे योग्य ती विचारपुस करुन रिक्षाचालकाचा नाव, पत्ता व भ्रमणध्वनी क्रमांक इ. माहिती प्रांदेशिक परिवहन कार्यालय, पुणे यांच्याकडुन प्राप्त करुन सदर रिक्षा चालकास त्यांचे भ्रमणध्वनीवर संपर्क करुन त्यांना सहकारनगर पोलीस स्टेशन येथे बोलावले व सदरचा मुददेमाल सुस्थितीत तक्रारदार यांना परत केला.

सदरची कामगिरी वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. अनिल शेवाळे, पोलीस निरीक्षक, गुन्हे श्री.विजय पुराणिक यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक श्री खेंगरे, मपोहवा. बारावकर, मपोना हिंगमिरे, मपोना यादव यांनी केली.

(अनिल शेवाळे)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
सहकारनगर पोलीस स्टेशन,पुणे शहर